# पीएम श्री केंद्रशाळा केनवडे येथे सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम उत्साहात

■ बंधुता न्यूज नेटवर्क

**केनवडे ।** (ता. कागल) डिजिटल युगात विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर व क्विक हील फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत पीएम श्री केंद्रशाळा केनवडे, ता. कागल येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात देवचंद महाविद्यालयातील कु. पल्लवी विजय पाटील व कु. पल्लवी सतीश पाटील या सायबर वॉरियर्स यांनी विद्यार्थ्यांना इंटरनेटचा सुरक्षित वापर, सोशल मीडियावरील धोके, सायबर फसवणूक, बनावट लिंक, ओटीपी व पासवर्डची गोपनीयता, ऑनलाइन गेमिंगचे दुष्परिणाम तसेच डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली असून डिजिटल जगात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचा संदेश देण्यात आला.

हा उपक्रम सायबर वॉरियर क्लबचे समन्वयक प्रा. प्रशांत कुंभार तसेच देवचंद महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आर.एम. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

कार्यक्रमास पीएम श्री केंद्रशाळा केनवडे येथील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करून भविष्यातही अशा जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.